मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 31 जानेवारी 2026 | पान- 1

# सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्रीपदी, सायंकाळी होणार शपथविधी

## महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच एका महिलेला उपमुख्यमंत्री पदाचा मान

**पिंपरी | प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या अकाली निधनाने रिक्त झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी सुनेत्रा पवार यांची निवड केली जाणार आहे. त्यानंतर लगेचच त्यांचा शपथविधी पार पडेल, असे समजते.

राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदाची निवड करण्यासाठी उद्या, शनिवारी आमदारांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली जाईल. त्यानंतर पवार यांचा शपथविधी पार पडण्याची शक्यता आहे. सुनेत्रा पवार यांचा राज्य मंत्रिमंडळात लगेचच समावेश करण्यात येणार आहे. हा शपथविधीचा समारंभ अत्यंत साधेपणाने पार पाडला जाईल.



सायंकाळी ५ वाजता शपथविधी सोहळा पार पडण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. तेव्हा पक्षाच्या वतीने सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांना देण्यात आली. शनिवारी दुपारी विधिमंडळ पक्षाची बैठक पार पडेल. त्यात सुनेत्रा पवार यांची एकमताने निवड केली जाईल. राष्ट्रवादीच्या वतीने लगेचच मुख्यमंत्र्यांकडे निवडीचे पत्र दिले जाणार आहे. सुनेत्रा पवार यांचा शपथविधी लगेचच पार पडेल, असे समजते. अर्थात, राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या नियोजित कार्यक्रमावर ते अवलंबून असेल.

अजित पवारांकडील वित्त व नियोजन, उत्पादन शुल्क ही खाती पक्षाकडेच कायम राहावी, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांकडे व्यक्त करण्यात आल्याचे समजते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, मंत्री छगन भुजबळ यांनी काही वेळा माध्यमांशी बोलताना म्हटले की, (३१ जानेवारी) सकाळी ११ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार) आमदारांची बैठक बोलविण्यात आली आहे. या बैठकीत विधिमंडळ पक्षनेतेपदी शिक्कामोर्तब केले जाईल. त्यानंतर उपमुख्यमंत्रीपदाचा शपथविधी सोहळा पार पडेल.

# ओला, सुका, घातक व सॅनिटरी कचरा वेगळा द्यावा

## शहरातील स्वच्छता व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी महापालिकेकडून विविध प्रयत्न करण्यात येत आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील स्वच्छता व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी महापालिकेकडून विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. या मोहिमेत नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने व्यापक जनजागृती केली जात आहे. त्या अनुषंगाने नागरिकांनी घरगुती कचरा चार प्रकारांत विलगीकरण करून घंटागाडीला द्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.




पिंपरी चिंचवड महापालिका आरोग्य विभागांतर्गत स्वच्छता मोहीम अधिक तीव्र करण्यासाठी घराघरांत संपर्क, फलक, पत्रके, समाजमाध्यमांद्वारे संदेश, तसेच स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने प्रबोधन केले जात आहे. नागरिकांना कचरा विलगीकरणाचे महत्त्व समजावून सांगितले जात आहे. योग्य पद्धतीने विलगीकरण केल्यास कचऱ्यावर वैज्ञानिक प्रक्रिया करणे सोपे होते. पुनर्वापराचे प्रमाण वाढते, लँडफिलवरील ताण कमी होतो आणि पर्यावरण संवर्धनास चालना मिळते. तसेच शहरातील दुर्गंधी, कचऱ्याचे ढीग व प्रदूषण नियंत्रण ठेवण्यास मदत होते. त्यामुळे नागरिकांनी घरातील कचरा चार प्रकारांत वेगळा करून तो वेळेत महापालिकेच्या घंटागाडीला द्यावा. कचरा इतरत्र न टाकता नियमानुसार संकलन वाहनालाच देऊन आपला

### कचऱ्याचे असे करा विलगीकरण

- » ओला कचरा : उरलेले अन्नपदार्थ, भाजीपाल्याचे तुकडे, फळांच्या साली इत्यादी; यासाठी हिरव्या रंगाच्या डब्याचा वापर करावा.
- » सुका कचरा : कागद, प्लॅस्टिक, काच, धातूच्या वस्तू, यासाठी निळ्या रंगाच्या डब्याचा वापर करावा.
- » घरगुती घातक कचरा : बॅटऱ्या, ट्यूबलाइट, बल्ब, औषधांचे अवशेष, रसायनयुक्त वस्तू यासाठी काळ्या रंगाच्या डब्याचा वापर करावा.
- » सॅनिटरी कचरा : सॅनिटरी पॅड, डायपर, वैद्यकीय वापरातील साहित्य यासाठी लाल रंगाच्या डब्याचा वापर करावा.

> “शहर स्वच्छतेसाठी कचरा विलगीकरण अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांनी ओला-सुका कचरा एकत्र न देता चार विविध प्रकारांत विलगीकरण करून तो महापालिकेच्या घंटागाडीला देत प्रशासनास सर्वतोपरी सहकार्य करावे.
> - डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# स्थायी समितीत भाजपचे वर्चस्व; पिंपरी-चिंचवड महापौरपद सोमवारी स्पष्ट

## भाजप 11, राष्ट्रवादी 4, शिवसेना 1 सदस्य; महापालिकेत सत्तासमीकरण ठळक

**पिंपरी | प्रतिनिधी**

नगरसेवकांच्या संख्येनुसार महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या असलेल्या स्थायी समितीमध्ये भाजपचे सर्वाधिक 11, राष्ट्रवादीचे 4 आणि शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे) 1 नगरसेवक असणार आहे. महापालिकेत अस्तित्वात असलेल्या तीनही पक्षाला स्थायी समितीचे सदस्यत्व मिळणार आहे. मात्र, नगरसेवक संख्या कमी असल्याने विविध विषय समित्यांमध्ये शिवसेनेच्या नगरसेवकांना संधी मिळणार नाही.

महापालिकेच्या निवडणुकीत 84 नगरसेवक निवडून आल्याने भाजपची एकहाती सत्ता आली आहे. एक अपक्ष नगरसेवक भाजपसोबत आहे. तर, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे 37 आणि शिवसेनेचे 6 नगरसेवक आहेत. असे महापालिकेतील नगरसेवकांचे बलाबल आहे. स्थायी समितीकडून हिरवा कंदील दिल्यानंतरच पालिकेची विकासकामे मार्गी लागतात. पालिकेच्या तिजोरीच्या चाव्या या समितीकडे असतात. त्यामुळे या महत्वाच्या समितीवर वर्णी लागावी म्हणून सर्वच नगरसेवकांचा आग्रह असतो. त्यासाठी पक्षश्रेष्ठींसह स्थानिक लोकप्रतिनिधींकडे त्यासाठी मनधरणी केली जात आहे.

विधी समिती, शहर सुधारणा समिती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती, शिक्षण समिती, महिला व बालकल्याण समिती अशा विविध 5 विषय समित्या आहेत. या विषय समितीमध्ये प्रत्येकी 9 नगरसेवक सदस्य असतात. त्या समितीमध्ये भाजपचे 6 आणि राष्ट्रवादीचे 3 नगरसेवक सदस्य असणार आहेत. नगरसेवक संख्या कमी असल्याने शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे) नगरसेवकांना त्या समितीमध्ये संधी मिळणार नाही.

त्यासाठी येत्या सोमवारी (दि. 2) दुपारी 3 ते सायंकाळी 5 या वेळेत उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. त्या दिवशी सत्ताधारी भाजपकडून ज्या नगरसेवकाकडून उमेदवारी अर्ज सादर होईल, तो महापालिकेचा नवीन महापौर असेल. महापौर पदाचे नाव त्या दिवशी अधिकृतरित्या समोर येईल.




### महापालिकेकडून महापौर निवडीची प्रक्रिया सुरु

» महापालिका प्रशासनाकडून महापौर निवड प्रक्रियेची तयारी सुरु करण्यात आली आहे. महापालिकेतील यशवंतराव चव्हाण सभागृह स्वच्छ करून घेण्यात येत आहे. तसेच, महापौर, उपमहापौर, विरोधी पक्षनेता, सत्तारूढ पक्षनेता, गटनेता, स्थायी समिती अध्यक्ष तसेच, विविध विषय समिती सभापती यांची दालने स्वच्छ करून आवश्यक ती दुरुस्ती कामे करून घेण्यात येत आहेत. पुणे सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या अध्यक्षतेखाली 6 फेब्रुवारीला विशेष सभा आयोजित केली आहे. त्या सभेत महापौर पदाची निवड केली जाईल. तर, महापौर पदासाठी उमेदवारी अर्ज 2 फेब्रुवारीला दुपारी 3 ते सायंकाळी 5 या वेळेत नगर सचिव विभागात स्वीकारले जाणार आहेत, असे महापालिकेचे नगरसचिव मुकेश कोळप यांनी सांगितले.

### अद्याप भाजप, राष्ट्रवादीची नोंदणी नाही

» निवडणुकीत विजयी झालेल्या नगरसेवकांचा पक्षनिहाय स्वतंत्र गट करुन त्यांची पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक असते. शिवसेनेची (एकनाथ शिंदे) नोंदणी झाली असून, गटनेतेपदी विश्वजित बारणे यांची निवड झाली आहे. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसची नोंदणी होणे अद्याप बाकी आहे. त्या गटांची नोंदणी झाल्यानंतर सत्तारूढ पक्षनेता आणि विरोधी पक्षनेत्याचे नाव समोर येऊ शकते.

### महापौराचे नाव सोमवारी समोर येणार

» महापालिकेच्या महापौर पदाच्या निवडीसाठी विशेष सर्वसाधारण सभा पुढील शुक्रवारी (दि. 6) सकाळी अकराला महापालिकेतील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित केली आहे. त्यासाठी येत्या सोमवारी (दि. 2) दुपारी 3 ते सायंकाळी 5 या वेळेत उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. त्या दिवशी सत्ताधारी भाजपकडून ज्या नगरसेवकाकडून उमेदवारी अर्ज सादर होईल, तो महापालिकेचा नवीन महापौर असेल. महापौर पदाचे नाव त्या दिवशी अधिकृतरित्या समोर येईल.

# चिखलीतील पाटीलनगरमध्ये रस्त्याचे काम रखडले; धुळीचे लोट आणि खड्ड्यांमुळे नागरिक हैराण

## चिखलीतील पाटीलनगर परिसरातील रस्ते विकासकामांचा वेग मात्र कमालीचा मंदावला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

एकीकडे शहराचा वेगाने विस्तार होत असतानाच, चिखलीतील पाटीलनगर परिसरातील रस्ते विकासकामांचा वेग मात्र कमालीचा मंदावला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या भागातील मुख्य रस्त्यांचे काम अर्धवट अवस्थेत रेंगाळल्याने स्थानिक रहिवासी आणि वाहनधारकांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खडी असून मातीचे साम्राज्य पसरल्याने थोड्याशा वाऱ्याने किंवा वाहनांच्या येण्या-जाण्याने धुळीचे लोट हवेत पसरत आहेत. दाट वस्ती असणाऱ्या या परिसरात राहणाऱ्या लोकांच्या वाहनांचे नुकसान तर होत आहे शिवाय शारीरिक समस्या आहे वाढल्या आहे. पाठदुखी, कंबर दुखीच्या दुखण्यात नागरिकांमध्ये वाढ झाली आहे. व्यापाऱ्यांच्या दुकानातील मालाचेही नुकसान होत आहे.

प्रशासनाकडून खोदकाम करून रस्ता तसाच सोडून दिल्याचा आरोप नागरिक करत आहेत. अर्धवट कामामुळे रस्त्यावर जागोजागी खडी पडली असून दुचाकीस्वारांचे घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे. रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश नसल्यास या खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अपघातांची मालिकाच सुरू झाली आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि शालेय विद्यार्थ्यांना या रस्त्यावरून चालताना मोठी कसरत करावी लागत आहे. महापालिकेने लवकरात लवकर हे काम पूर्ण करावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.



> रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे परंतु पाण्याच्या पाईपलाईनचे काम आधी करणे आवश्यक असल्याने रस्त्याचे काम काही काळापुरते स्थगित केले आहे. पाईपलाईनचे काम पूर्ण झाल्यावर त्वरित रस्त्याचे काम पूर्ण केले जाईल. पाणीपुरवठा विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे.
>
> **- शिवाजी चौरे, स्थापत्य अधिकारी, फ प्रभाग**

> "गेल्या अनेक महिन्यांपासून रखडलेले पाटील नगर येथील रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करावे, अशी प्रशासनाला मागणी आहे. प्रशासकीय बाबींची तातडीने पूर्तता करावी. अनेक नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. प्रशासनाने नागरिकांच्या संयमाचा अंत पाहू नये अन्यथा आम्हाला यावर आंदोलन छेडावे लागेल."
>
> **- विकास साने, नगरसेवक**

# सिग्नलवरील चिमुकल्यांचे बालपण वाचणार

## पुणे महापालिका रस्त्यावर काम करणाऱ्या मुलांसाठी पहिल्यांदाच सर्वसमावेशक असा विशेष प्रकल्प हाती घेणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील प्रमुख चौक आणि सिग्नल परिसरात लाल दिवा लागला की, वाहनांइतक्याच वेगाने लहान मुलांचे हात पुढे येतात. कुणी फुगे, रुमाल विकतो, तर कुणी भीक मागतो. शाळेच्या वर्गात बसण्याच्या वयात ही मुले रस्त्यावर उभी राहण्यास भाग पडत असून शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षित बालपणापासून ती दूर जात आहेत. या गंभीर परिस्थितीवर उपाय म्हणून पुणे महापालिका रस्त्यावर काम करणाऱ्या व भीक मागणाऱ्या मुलांसाठी पहिल्यांदाच सर्वसमावेशक असा विशेष प्रकल्प हाती घेणार आहे.

त्या अंतर्गत शहरात बालमजुरी व भिकेच्या नावाखाली होणाऱ्या मुलांच्या वापराला आळा घालून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यात प्रामुख्याने रस्त्यावर साहित्य विक्री करणाऱ्या लहान हातात कामाऐवजी शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या समाज विकास विभागाकडून देण्यात आली.




### दबाव, शोषण व असुरक्षिततेवर नियंत्रण

» महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत हा प्रकल्प राबविला जाणार असून, शहरातील सिग्नल, चौक व गर्दीच्या ठिकाणी आढळणाऱ्या मुलांचे सविस्तर सर्वेक्षण करण्यात येणार आहे. प्रत्यक्ष पाहणीद्वारे मुलांची ओळख, त्यांची पार्श्वभूमी व परिस्थिती समजून घेतली जाणार आहे, त्यामागे असलेले दबाव, शोषण व असुरक्षिततेवर नियंत्रण आणण्यावर भर दिला जाणार आहे.

### आरोग्यावर केले जाणार काम

» या मुलांच्या शिक्षणासोबतच आरोग्याच्या बाबतीतही ठोस उपाययोजना करण्यात येणार असून, या मुलांची नियमित आरोग्य तपासणी, उपचार, लसीकरण व पोषणविषयक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. आजारमुक्त आणि सुरक्षित बालपण देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.

### हा उपक्रम टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार

» महापालिक' घरट' प्रकल्पाशी या मुलांना जोडून सुरक्षित निवारा, मार्गदर्शन आणि पुनर्वसनाची व्यवस्था केली जाणार आहे. तात्पुरत्या मदतीऐवजी दीर्घकालीन पुनर्वसन, शिक्षण आणि समाजात पुनर्स्थापना यावर भर देण्यात येणार आहे. हा उपक्रम एक ते दीड महिन्यांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार असल्याचे समाज विकास विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत हा प्रकल्प राबविला जाणार असून, शहरातील सिग्नल, चौक व गर्दीच्या ठिकाणी आढळणाऱ्या मुलांचे सविस्तर सर्वेक्षण करण्यात येणार आहे. प्रत्यक्ष पाहणीद्वारे मुलांची ओळख, त्यांची पार्श्वभूमी व परिस्थिती समजून घेतली जाणार आहे, त्यामागे असलेले दबाव, शोषण व असुरक्षिततेवर नियंत्रण आणण्यावर भर दिला जाणार आहे.

या उपक्रमात शिक्षण हा मुख्य आधार असेल. रस्त्यावर आढळणाऱ्या मुलांची सामाजिक संस्थांच्या माध्यमातून नोंदणी करून त्यांच्या शैक्षणिक पातळीप्रमाणे शाळेत प्रवेश दिला जाणार आहे. कधीच शाळेत न गेलेली तसेच शिक्षण अर्धवट सोडलेली मुले यांच्यासाठी विशेष शिक्षण योजना राबविण्यात येणार असून, त्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली जाणार आहे.

मुलांच्या शिक्षणासोबतच आरोग्याच्या बाबतीतही ठोस उपाययोजना करण्यात येणार असून, या मुलांची नियमित आरोग्य तपासणी, उपचार, लसीकरण व पोषणविषयक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. आजारमुक्त आणि सुरक्षित बालपण देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे. तसेच, महापालिक' घरट' प्रकल्पाशी या मुलांना जोडून सुरक्षित निवारा, मार्गदर्शन आणि पुनर्वसनाची व्यवस्था केली जाणार आहे. तात्पुरत्या मदतीऐवजी दीर्घकालीन पुनर्वसन, शिक्षण आणि समाजात पुनर्स्थापना यावर भर देण्यात येणार आहे. हा उपक्रम एक ते दीड महिन्यांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार असल्याचे समाज विकास विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

# ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात पुणे दुसऱ्या क्रमांकावर

## 150 दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमात पुण्याचे यश; तक्रार निवारण आणि ऑनलाईन सेवांमध्ये पारदर्शकता आणल्याने मिळाला बहुमान.

**पुणे | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री यांच्या १५० दिवस ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये प्रशासनिक सुधारणा करण्याच्या उद्देशाने स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत कार्यालयांची संकेतस्थळे, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन माहिती फलक, व्हॉट्सअॅप संवाद प्रणाली, शासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता व ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर तसेच भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर अशा सात सर्वंकष निकषांवर मूल्यमापन करण्यात आले.



### द्वितीय क्रमांक प्राप्त

» तसेच, पालिकेच्या विविध प्रकल्पांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता व भौगोलिक माहिती प्रणालीवर आधारित तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्यात आला आहे.राज्यातील २९ महापालिकांच्या झालेल्या मूल्यमापनात पुणे महानगरपालिकेला २०० पैकी १८६.२५ गुण मिळून राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांच्याकडून करण्यात आले.

या कार्यक्रमातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यालयांची निवड प्रजासत्ताक दिनी जाहीर करण्यात आली.१५० दिवस ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत पुणे महानगरपालिकेने नव्या तंत्रज्ञानावर आधारित आधुनिक संकेतस्थळ विकसित केले आहे. नागरिकांसाठी ऑनलाइन सेवा पोर्टल, तक्रारींचे विश्लेषण व व्यवस्थापन, व्हॉट्सअॅपद्वारे सेवा, तक्रार निवारण तसेच माहिती देण्यासाठी नागरिकाभिमुख प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

तसेच, पालिकेच्या विविध प्रकल्पांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता व भौगोलिक माहिती प्रणालीवर आधारित तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्यात आला आहे.राज्यातील २९ महापालिकांच्या झालेल्या मूल्यमापनात पुणे महानगरपालिकेला २०० पैकी १८६.२५ गुण मिळून राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांच्याकडून करण्यात आले.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) पवनीत कौर आणि अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत हे कामकाज करण्यात आल्याची माहिती माहिती तंत्रज्ञान प्रमुख राहुल जगताप यांनी दिली.


# देशातील पहिली सोडियम बॅटरी तयार; दुचाकी, तीनचाकी वाहनांसाठी उपलब्ध होणार

## भारतात अशा प्रकारची बॅटरी पहिल्यांदाच तयार करण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

देशातील पहिली सोडियम बॅटरी पुण्यात तयार झाली असल्याचा दावा शास्त्रज्ञांनी केला आहे. ही बॅटरी एआरएआय (ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया )च्या वतीने आयोजित प्रदर्शनात प्रथमच प्रदर्शित करण्यात आली. त्यामुळे लवकरच दुचाकी, तीनचाकी वाहनांसाठी ती बाजारात येऊ शकेल.

भारतात अशा प्रकारची बॅटरी पहिल्यांदाच तयार करण्यात आली आहे. या संशोधनाला केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयाच्या अखत्यारीत काम करत असलेल्या ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया ( एआरएआय )ने मान्यता दिली आहे. ही संस्था देशातील वाहन उद्योगाची प्रमाणन, संशोधन व विकास संस्था आहे. ही बॅटरी एआरएआयच्या वतीने मोशी येथील पुणे इंटरनॅशनल एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर (पीआयईसीसी) येथे आयोजित केलेल्या 'सिम्पोझियम ऑन इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजी या प्रदर्शनात ठेवण्यात आली आहे.




### संशोधनासाठी उभारला ४ कोटींचा निधी

» एआरएआयच्या 'टेक्नोव्हस' या खास वाहन उद्योगातील स्टार्टअपसाठी असलेल्या व्यासपीठाच्या माध्यमातून रिचार्जीऑन एनर्जी या कंपनीला लिथियम बॅटरीला पर्याय म्हणून सोडियम आयन बॅटरी तयार करण्यासाठी सुरुवातीला आवश्यक मदत व काही निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यानंतर केंद्रीय अवजड उदयोग मंत्रालय, इंडो यूएस प्रोग्राम आणि युनायटेड नेशन यांच्याकडून ही बॅटरी विकसित करण्यासाठी सुमारे ४ कोटी रुपये इतका संशोधन व विकास निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याचे डॉ. शेळके यांनी सांगितले.

### 'एनसीएल' मधील स्टार्टपची कमाल

» पुढील आठ ते नऊ महिन्यांत ही बॅटरी भारतीय बाजारपेठेत उपलब्ध होणार असल्याची माहिती बॅटरी विकसित करणाऱ्या रिचार्जीयन एनर्जी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विलास शेळके यांनी दिली. ही कंपनी पाषाण येथील केंद्र सरकारच्या राष्ट्रीय रासायनिक संस्थेच्या ( एनसीएल ) इनोव्हेशन पार्कमध्ये कार्यरत आहे.

" भारतात सोडियमचे साठे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. सोडियम हे समुद्राच्या पाण्यातून मिळते. ही बॅटरी तयार करण्यासाठी शेतातील टाकाऊ माल (अंग्री वेस्ट) वापर करण्यात येतो. लिथियम बॅटरी तयार करण्यासाठी आपल्याला अनेक गोष्टी विदेशातून मागवाव्या लागतात. मात्र, सोडियम आयन बॅटरीची निर्मितीची प्रक्रिया भारतातच करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या बॅटरीला आग लागत नाही. याची चाचणी एआरएआयने १२० अंश सेल्सिअस तापमानावर केली आहे, त्यामध्ये ही बॅटरी यशस्वी झाली आहे.

- अजय सूर्यवंशी, सहशहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग,

एआरएआयच्या 'टेक्नोव्हस' या खास वाहन उद्योगातील स्टार्टअपसाठी असलेल्या व्यासपीठाच्या माध्यमातून रिचार्जीऑन एनर्जी या कंपनीला लिथियम बॅटरीला पर्याय म्हणून सोडियम आयन बॅटरी तयार करण्यासाठी सुरुवातीला आवश्यक मदत व काही निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यानंतर केंद्रीय अवजड उदयोग मंत्रालय, इंडो यूएस प्रोग्राम आणि युनायटेड नेशन यांच्याकडून ही बॅटरी विकसित करण्यासाठी सुमारे ४ कोटी रुपये इतका संशोधन व विकास निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याचे डॉ. शेळके यांनी सांगितले.

**संशोधकांनी केलेले दावे**

सोडियम आयन बॅटरी इलेक्ट्रीक वाहनांसाठी वापरता येणे शक्य असून, तिच्या चार्जिंगसाठी ३० मिनिटांचा अवधी लागतो.एकदा बसवलेल्या या बॅटरीची लाइफ लिथियम बॅटरीच्या तीनपट म्हणजे २२ वर्षांपर्यंत असेल. किंमत सध्या वापरात असलेल्या लिथियम बॅटरीपेक्षा २५ ते ३० टक्के कमी असेल.पुढील आठ ते नऊ महिन्यांत ही बॅटरी इलेक्ट्रीक गाड्यांसाठी बाजारात उपलब्ध होणार आहे.पहिल्या टप्प्यात दुचाकी, दुसऱ्या टप्प्यात तीनचाकी आणि तिसऱ्या टप्प्यात चारचाकी वाहनासाठी ही बॅटरी उपलब्ध करून देण्यात येईल.नजीकच्या काळात निर्मिती करण्यासाठी पुण्यामध्ये कारखाना सुरु करण्याची योजना असून, त्यासाठी ५० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे.

# "सुनेत्रा वहिनींना उपमुख्यमंत्री करा"; नवाब मलिक, नरहरी झिरवाळ यांच्याकडून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचे संकेत

## दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात ही जनतेची ईच्छा आहे. त्यानुसार लवकरच निर्णय घेण्यात येईल, अशी भूमिका राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मांडली.

**पुणे | प्रतिनिधी**

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात ही जनतेची ईच्छा आहे. त्यानुसार लवकरच निर्णय घेण्यात येईल, अशी भूमिका राष्ट्रवादीच्या नेत्यांनी गुरुवारी मांडली. तर, सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादीची धुरा सांभाळावी. त्यांना उपमुख्यमंत्री करण्यात यावे. सुनेत्रा वहिनींच्या मंत्रिमंडळ सहभागासाठी वरिष्ठ पातळीवर चर्चा करणार असल्याचे राज्याचे अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले.



### अजित दादांना खरी श्रद्धांजली

» झिरवाळ म्हणाले, 'सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादीची धुरा सांभाळावी. त्यांना उपमुख्यमंत्री करण्यात यावे. हीच अजित दादांना खरी श्रद्धांजली असेल. त्यासाठी वरिष्ठ पातळीवर चर्चा करणार आहे,' 'दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात, ही संपूर्ण महाराष्ट्राची मागणी होती. आता ही मागणी आणखी जोरकसपणे होईल. कारण, असे विखुरलेले राहून चालणार नाही. एकत्रच राहावे लागणार आहे, हे आपले विचार आहेत. तसेच सर्वसामान्यांचेही हेच विचार आहेत,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

अजित पवार यांच्या पार्थिवावर बारामतीत विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी राष्ट्रवादीच्या नेत्यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर माध्यमांशी बोलताना नरहरी झिरवाळ, नवाब मलिक यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचे संकेत दिले.

झिरवाळ म्हणाले, 'सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादीची धुरा सांभाळावी. त्यांना उपमुख्यमंत्री करण्यात यावे. हीच अजित दादांना खरी श्रद्धांजली असेल. त्यासाठी वरिष्ठ पातळीवर चर्चा करणार आहे,''दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात, ही संपूर्ण महाराष्ट्राची मागणी होती. आता ही मागणी आणखी जोरकसपणे होईल. कारण, असे विखुरलेले राहून चालणार नाही. एकत्रच राहावे लागणार आहे, हे आपले विचार आहेत. तसेच सर्वसामान्यांचेही हेच विचार आहेत,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत नवाब मलिक यांनीही भाष्य केले. ते म्हणाले,'दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत कल्पना नाही. मात्र, ही जनतेची ईच्छा आहे. याबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय होईल.'